RNI No. MAHBIL/2012/72704
www.dgps.maharashtra.gov.in

# महाराष्ट्र शासन राजपत्र
# भाग एक–अ–नाशिक विभागीय पुरवणी

वर्ष - १०, अंक - ४ ] गुरुवार ते बुधवार, मार्च १८ - २४, २०२१ / फाल्गुन २७, शके १९४२ ते चैत्र ३, शके १९४३ [ पृष्ठे १०

## प्राधिकृत प्रकाशन

### मुख्याधिकारी यांजकडून

### संगमनेर नगरपरिषद, संगमनेर

### संगमनेर नगरपरिषद हद्दीतील अनधिकृत बांधकामावर नियंत्रण ठेवण्यासाठी पदनिर्देशित अधिकारी नियुक्ती

### आदेश

क्रमांक आस्था/२/५४९/२०२१.– ज्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ५३ व महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम १८९ अन्वये नियोजन प्राधिकरणाच्या अधिकाराचा वापर करण्याच्या प्रयोजनासाठी पदनिर्देशित करील. पदनिर्देशित अधिकाऱ्यास अधिसूचनेमध्ये नमूद केलेल्या अशा स्थानिक क्षेत्रावर अधिकारिता असेल आणि वेगवेगळ्या स्थानिक क्षेत्रासाठी वेगवेगळे पदनिर्देशित अधिकारी पदनिर्देशित करण्याची तरतूद आहे.

संगमनेर नगरपरिषद क्षेत्रासाठी 'ब' व 'क' वर्ग नगरपरिषदेसाठी लागू असलेली प्रभावित विकास नियंत्रण नियमावली, दिनांक २ नोव्हेंबर १९७९ पासून अंमलात आलेली होती व सुधारित विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली, दिनांक २१ नोव्हेंबर २०१३ रोजी अंमलात आलेली आहे.

त्याअर्थी, अनधिकृत बांधकामावर प्रभावी नियंत्रणासाठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ५२ ते ५५ मध्ये असणाऱ्या तरतुदी लागू आहेत तसेच महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ मधील कलम १८९ चे १९९ मध्ये असणाऱ्या अधिकारानुसार मा. मुख्याधिकारी यांनी नगरपरिषदेच्या संबंधित अधिकाऱ्यांना अनधिकृत बांधकामावर नियंत्रण आणण्यासाठी त्या तरतुदीच्या अनुषंगाने अंमलबजावणीसाठी खालील नमूद क्षेत्रासाठी पदनिर्देशित अधिकारी म्हणून घोषित करीत आहे.

| बीट क्रमांक | बीट निरीक्षक/बीट मुकादम | बीट सुपरवायझर/ प्रभाग अधिकारी | पडताळणी अधिकारी/ नोडल अधिकारी |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | श्री. जयराम सावळेराम मंडलीक | श्री. कुलदीप राजेंद्र पाटील | श्री. राजेंद्र विजय सुतावणे, |
| २ | श्री. अजय जगदिश जेधे | श्री. शुभम दिलीप देसले | नगर अभियंता तथा |
| ३ | श्री. अनिल पांडुरंग काळण | श्री. सुदाम बाळासाहेब सातपुते | बांधकाम विभाग प्रमुख. |
| ४ | श्री. रमेश केरू ताजणे | श्री. अल्ताफ ईस्माईल शेख | |
| ५ | श्री. चंद्रकांत शंकर ढोले | श्री. अकलाख गुलाममहंमद शेख | |

| बीट निरीक्षक/ बीट मुकादम | चतु:सीमा |
|---|---|
| श्री. जयराम सावळेराम मंडलीक प्रभाग क्रमांक १ व २. | **व्याप्ती :** श्रमिकनगर, गोविंदनगर, गणेशनगर, जनतानगर, जयजवान चौक, तिवारी मळा, इंदिरानगरचा काही भाग, चैतन्यनगर, बडोदा बँक कॉलनी.<br>**उत्तर** : १३२ के. व्ही. समोर, अकोले बायपासने तिवारी मळा.<br>**पूर्व** : १३२ के. व्ही. समोर नगरपालिका हद्द अकोले बायपास रोड, नाशिक-पुणे हायवेने श्री. नाईक यांचे फुल भांडार.<br>**दक्षिण** : नाईक फुल भांडार, मार्केटयार्ड भिंत, इंदिरानगर, १० नंबर गल्लीपर्यंत, कॉर्नर किराणा.<br>**पश्चिम** : मुर्तडक कॉम्प्लेक्स बायपास रोडने तिवारी मळा. |
| श्री. जयराम सावळेराम मंडलीक प्रभाग क्रमांक ३ व ४. | **व्याप्ती :** ऑरेंज कॉर्नर, सुयोग कॉलनी, सह्याद्री कॉलेज, पद्मानगर, मालपाणी लॉन्स, दिवटे किराणा, सहजीवन सोसायटी, बापुसाहेब कॉलनी, मालदाड रोड, गिरीराज विहार, सातपुते मळा, पावबाकी, सौभाग्य मंगल कार्यालय.<br>**उत्तर** : नगरपरिषद हद्द १३२ के. व्ही. ते साईश्रद्धा चौक ते तिरंगा चौक ते पावबाकी मारुती मंदिर.<br>**पूर्व** : नगरपालिका हद्द पावबाकी मारुती मंदिर ते मालपाणी प्लॉट.<br>**दक्षिण** : पुणे-नाशिक हायवे सह्याद्री शाळेसमोर, सिद्धेश्वर डेअरी ते शिवाजीनगर शॉपिंग कॉम्प्लेक्स.<br>**पश्चिम** : नगरपालिका हद्द १३२ के. व्ही. ते सह्याद्री शाळेसमोर, सिद्धेश्वर डेअरी. |
| श्री. चंद्रकांत शंकर ढोले प्रभाग क्रमांक ६ व १४. | **व्याप्ती :** पंचायत समिती, पवार वस्ती, कोल्हेवाडी रोड, अलकानगर, मदीनानगर, जमजम कॉलनी, भारतनगर, मौलाना आझाद मंगल कार्यालय, फादरवाडी, रेहमतनगर, यंग नॅशनल, लखमीपुरा, नाईकवाडपुरा, पुणे नाका डाके मळा.<br>**उत्तर** : नगरपालिका हद्द पंचायत समिती, मंडलिक यांची शेती, कोल्हार घोटी रस्त्याने तीन बत्ती चौक, सहस्त्रार्जुन मंगल कार्यालय.<br>**पूर्व** : प्रवरा नदी, दक्षिण बाजू ते नवीन जोर्वे रोड ते नगरपालिका हद्दीने जुना जोर्वे रोड, कोल्हेवाडी रोड, कोल्हार घोटी रोड, जुने पंचायत समिती ते मंडलिक यांची शेती.<br>**दक्षिण** : नगरपालिका हद्द प्रवरा नदी दक्षिण काठ ते नगरपालिका हद्दीने प्रवरा पूल ते अमरधाम नाईकवाडपुरा कब्रस्थान.<br>**पश्चिम** : सहस्त्रार्जुन मंगल कार्यालय, पुणे-नाशिक हायवे, मौलाना आझाद मंगल कार्यालय, लखमीपुरा कब्रस्थान ते आयुब खादीवाले ते इकबाल वखारवाले ते गुलाम दस्तगीर यांचे घर ते डी. एड. कॉलेज कोपरा ते नाईकवाडपुरा कब्रस्तान. |

श्री. अजय जगदिश जेधे
प्रभाग क्रमांक ५ व ७.

**व्याप्ती** : शिवाजीनगर, जाणता राजा मैदान, मेहेर विद्यालय, हॉटेल करम, हॉटेल हिरा, जानकीनगर, विद्यानगर, सातपुते मळा, पानसरे वस्ती, कुरण रोड, पुनर्वसन कॉलनी, विजयनगर, नाटकी नाला, सुकेवाडी रोड, ज्ञानमाता विद्यालय, ताजणे मळा, बागवान मळा.

**उत्तर** : मालदाड रोड कृषी सेवा केंद्र गोडाऊन, १५ फुटी डी.पी. रस्त्याने जाणता राजा मैदानाचे उत्तरेकडील बाजुने पावबाकी रस्ता, नगरपालिका हद्दीने पेटकर प्लॉट ते कैलास घोडेकर ते मीरा हॉटेल, नगरपालिका हद्द मंडलिक यांची शेती.

**पूर्व** : पंचायत समिती गुंजाळ आखाडा नगरपालिका हद्द.

**दक्षिण** : पंचायत समिती कोल्हार घोटी रोडने दिल्ली नाका ते जुने पोस्ट ऑफीस.

**पश्चिम** : जुने पोस्ट ऑफीस ते दुर्वे नाना शॉपिंग कॉम्प्लेक्स ते तारापान सिद्धेश्वर डेअरी ते देना बँक, श्रीकांत देशमुख हॉस्पिटल, फटांगरे दवाखाना ते जय हिंद सर्कल.

श्री. रमेश केरु ताजणे
प्रभाग क्रमांक ८ व ९.

**व्याप्ती** : बी. एड. कॉलेज, पोलीस लाईन, संजय गांधीनगर, तहसील कार्यालय, माळीवाडा, भिल्ल वस्ती, भरीतकर मळा, देवाचा मळा, इंदिरानगर, पंजाबी कॉलनी, एस. टी. डेपो, सावता माळीनगर.

**उत्तर** : इंदिरानगर, सरस्वती हॉटेल, मार्केटयार्ड दक्षिणेकडील भिंतीने इंदिरानगर ९ नंबर गल्लीचा कोपरा, करंजेकर यांचे घर ते मुर्तडक कॉम्प्लेक्स.

**पूर्व** : जयजवान चौक सरस्वती हॉटेल ते एस. टी. स्टँड ते स्टायलो टेलर ते अशोक चौक.

**दक्षिण** : अशोक चौक, बडोदा बँक ते मांडुळे ते काठे वखार माळीवाडा, मारुती मंदिर ते म्हाळुंगी नदीवरील पूल ते पगुबाई गोडाऊन.

**पश्चिम** : देवाचा मळा, नगरपालिका हद्दीने नवीन तांबे हॉस्पिटल, इदगाह मागील बाजूने विठ्ठल मंदिरापर्यंत.

श्री. चंद्रकांत शंकर ढोले
प्रभाग क्रमांक ११ व १३.

**व्याप्ती** : शिवाजी पुतळा, अरगडे गल्ली, नवघर गल्ली, गवंडीपुरा, खाटीक गल्ली, मेन रोड, सय्यद बाबा चौक, साईनाथ चौकापर्यंत, बाजार पेठ, देवी गल्ली, अहिल्यादेवी शाळा, पंधारे गल्ली, सराफ विद्यालय, घासबाजार, मोठा खाटीक खाना.

**उत्तर** : छत्रपती शिवाजी महाराज पुतळा, प्रवरा बँक समोरील आर. जी. कापड दुकान, बागवानपुरा गल्ली मार्गाने इंदिरा गार्डन, दक्षिणेकडून माधव पार्वती कॉम्प्लेक्स, दक्षिण बाजूने ताजणे मळा, बागवान मळा, पेट्रोल पंपाचे मागून अलका फ्रुट.

**पूर्व** : कोल्हे मोटारपासून नाशिक-पुणे हायवेने विकास ट्रान्सपोर्ट, अन्वर इलेक्ट्रिक ते अलका बॅटरी दक्षिण बोळ.

**दक्षिण** : न. पा. समोरील पवार किराणा ते लालाजी चौक, तेलीखुंट मोगलपुरा मस्जिद, पी. डब्ल्यू. भिंत ते अलका बॅटरी.

**पश्चिम** : पवार किराणा, माळीवाडा २ नंबर शाळा, बडोदा बँक, स्वातंत्र्य चौक, अशोक चौक ते शिवाजी पुतळा.

श्री. अनिल पांडुरंग काळण
प्रभाग क्रमांक १० व १२.

**व्याप्ती** : चव्हाणपुरा, रंगार गल्ली, जेधे कॉलनी, नगरपालिका घोडेकर मळा, साई मंदिर, केशव तीर्थ, काठे मळा, खंडोबा गल्ली, सुतार गल्ली, तांदुळ बाजार, पेटीट विद्यालय, नेहरू चौक, वाडेकर गल्ली, डीएड कॉलेज, परदेशपुरा.

**उत्तर** : राजापूर रोड, म्हाळुंगी पूल ते कोहकडे यांचे इलेक्ट्रिक दुकान, लालबहादूर शास्त्री चौक ते तेली खुंट.

**पूर्व** : तेली खुंट, खंडोबा मंदिर, मेंद्रे जनरल स्टोअर्स ते नाकील इलेक्ट्रिक ते महादेव मंदिर ते लंगर बिडी ते अंजुमन प्रायमरी, शिफा मेडिकल ते पी. डब्ल्यू. भिंत.

**दक्षिण** : नगरपालिका हद्द प्रवरा नदी दक्षिण काठ, साठम मठ स्वामी समर्थ मंदिर, प्रवरा नदी काठ नगरपालिका हद्दीने खांडगाव आडव रस्ता.

**पश्चिम** : कासारवाडी शीव खांडगाव आडवा रस्ता, काशाई मंदिर, गगनगिरी मंदिर ते राजापूर रोड.

**बीट निरीक्षक / बीट मुकादम यांची कर्तव्ये :**

बीट (सेक्शन/वार्ड) मध्ये दररोज गस्त घालून बीटमध्ये अनधिकृत बांधकाम, अतिक्रमण, अनधिकृत होर्डिंग्ज/बॅनर/फ्लेक्स, अनधिकृत खोदकाम, अनधिकृत नळ कनेक्शन, अनधिकृत फेरीवाले इत्यादी स्वरूपाचे नागरी गुन्हे घडू नयेत याची दक्षता घ्यावी. बीटमध्ये चालू असलेल्या बांधकामाच्या परवानगीची कागदपत्रे, होर्डिंग्ज/बॅनर/फ्लेक्स लावण्याची परवानगी, फेरीवाला अनुज्ञप्ती किंवा नोंदणीपत्र इत्यादी तपासणी करून आवश्यक परवानगी नसेल अशी प्रकरणे बीट सुपरवायझर/प्रभाग अधिकारी किंवा पडताळणी अधिकारी किंवा मुख्याधिकारी यांच्या निदर्शनास लेखी स्वरूपात आणावी.

**बीट सुपरवायझर / प्रभाग अधिकारी यांची कर्तव्ये :**

बीट मुकादम/बीट निरीक्षक यांचेकडून अतिक्रमण/अनधिकृत बांधकाम, अनधिकृत होर्डिंग्ज/बॅनर/फ्लेक्स, अनधिकृत खोदकाम, अनधिकृत नळ कनेक्शन, अनधिकृत फेरीवाले इत्यादी घटनांबाबत प्राप्त झालेले रिपोर्ट/अभिलेखे यांची व्यक्तिश: शहानिशा, तपासणी करावी व त्याचा सद्यस्थिती अहवाल दररोज न चुकता अतिक्रमण निर्मूलन अधिकारी/अतिक्रमण विभाग प्रमुख तथा अतिक्रमण निर्मूलन अधिकारी यांचे अभिप्रायासह मा. मुख्याधिकारी यांना देण्यात यावा. तसेच नगरपरिषद क्षेत्रात सुरू असलेली सर्व नवीन बांधकामे मंजूर आराखड्यानुसार होत आहेत किंवा कसे याची पाहणी नियमितरीत्या करावी व मंजूर आराखड्याशिवाय बांधकाम सुरू असल्याचे आढळल्यास नियमानुसार कारवाई करावी तसेच निदर्शनास आलेल्या/आणण्यात आलेल्या अतिक्रमण/अनधिकृत बांधकामे/अनधिकृत फेरीवाले/अनधिकृत जाहिरात फलक इत्यादी नागरी गुन्ह्याबाबत विहित मुदतीत नोटीस द्यावी व त्याबाबत त्वरित नियमानुसार विहित कालावधीत कार्यवाही करावी.

**अतिक्रमण निर्मूलन अधिकारी तथा पडताळणी अधिकारी तथा नोडल अधिकारी यांची कर्तव्ये :**

बीटमध्ये चालू असलेल्या बांधकामांबाबत बीट सुपरवायझर यांचेकडून प्राप्त होणाऱ्या कागदपत्रांची तांत्रिक तपासणी करणे. त्याचप्रमाणे संबंधित क्षेत्रामध्ये झालेल्या अनधिकृत बांधकाम/अतिक्रमण यांचे नकाशे (Not to Scale) तयार करणे व संपूर्ण अहवाल तयार करून सदर इमारतींबाबत बीट सुपरवायझर/प्रभाग अधिकारी यांचेमार्फत किंवा स्वत: फौजदारी गुन्हे दाखल करणे व मा. न्यायालयात नगरपरिषदेची बाजू मांडणे व मा. न्यायालयात उपस्थित राहणे व कायद्यातील तरतुदींनुसार संबंधितांवर नियमानुसार कार्यवाही करणे.

वेळोवेळी मुख्याधिकारी यांनी निर्गमित केलेल्या विवक्षित आदेशामध्ये नमूद केलेल्या कार्यक्षेत्रासाठी नियुक्ती कर्मचारी / अधिकारी यांच्या नियुक्तीच्या कालावधीत या अधिसूचनेनुसार पदनिर्देशित अधिकारी समजण्यात येईल. अनधिकृत बांधकामे व त्यावर करावयाची कार्यवाही खाली विशद केल्याप्रमाणे आहे.

(१) आतापर्यंत प्राप्त झालेल्या सर्व अनधिकृत बांधकामविषयक तक्रारींची पाहणी करून उचित कार्यवाही करणे.

(२) अनधिकृत बांधकामे थांबविण्याबरोबरच नगररचना कायद्यातील आवश्यक त्या परवानगीशिवाय केलेली बांधकामे यांच्यावर कार्यवाही करणे.

(३) घेतलेल्या बांधकाम परवानगीशी सुसंगत नसलेले किंवा परवानगी देताना घातलेल्या अटींचा भंग करून केलेले काम यांच्यावर कार्यवाही करणे.

(४) मंजूर तळपृष्ठ निर्देशांकापेक्षा जादा केलेली बांधकामे (FSI) यांच्यावर कार्यवाही करणे.

(५) परवानगीचा कालावधी संपल्यानंतर केलेले काम, यांच्यावर कार्यवाही करणे.

(६) परवानगीच्या विरोधात जाऊन केलेले काम, जसे जमिनींच्या वापरात विनापरवाना बदल वगैरे.

**उक्त बांधकाम यांना अनधिकृत बांधकाम समजण्यात यावे व त्यावर पुढीलप्रमाणे कार्यवाही करावी :**

(१) बांधकाम थांबविणे.

(२) बांधकाम पाडणे.

(३) अशा बांधकामास जबाबदार असणाऱ्या व्यक्तींवर खटला भरणे.

(४) घरमालकांच्या निष्काळजीपणामुळे किंवा जाणीवपूर्वक केलेल्या बांधकामामुळे लगतच्या इतर इमारतीस वायुवीजन, प्रकाश इत्यादी मूलभूत हक्कांपासून वंचित ठेवणारी बांधकामे किंवा परिसरास हानी पोहोचविण्यास जबाबदार असणाऱ्या व्यक्तींवर दंडात्मक कार्यवाही करणे.

(५) कोणत्याही इमारतीचे उभारणीचे काम अथवा बांधकाम उक्त अधिनियमांच्या किंवा उपविधीच्या तरतुदीचा भंग करीत असल्याचे पदनिर्देशित अधिकाऱ्याचे निदर्शनास आणून दिले असेल आणि जर असा पदनिर्देशित अधिकारी पुरेशा कारणाशिवाय, कलम ५३, ५४, ५५ किंवा ५६ अन्वये किंवा महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम १८९ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे कार्यवाही करणेस कसूर करीत असेल तर, त्यास दोषसिद्धीनंतर ३ महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा होईल किंवा रुपये २०,००० पर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल अथवा दोन्ही शिक्षा करण्याची तरतूद आहे, त्याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

(६) वरील नियुक्त अधिकारी/सेवक यापैकी बीट निरीक्षक/बीट मुकादम हे अतांत्रिक कर्मचारी असल्यामुळे त्यांनी वरीलप्रमाणे कार्यवाही करणेपूर्वी प्रभाग अधिकारी यांचे मार्गदर्शन घेऊनच कार्यवाही करावयाची असून, प्रभाग अधिकारी यांनी सर्व नियुक्त बीट निरीक्षक/बीट मुकादम अधिकारी यांचेवर नियंत्रण ठेवावयाचे आहे. पडताळणी अधिकारी हे तांत्रिक कर्मचारी/अधिकारी असल्याकारणाने त्यांनी त्वरित अनधिकृत/अतिक्रमित जागेचे नकाशे, मोजमापे इत्यादी तयार करून त्वरित संपूर्ण अहवालासह बीट सुपरवायझर/प्रभाग अधिकारी यांचेमार्फत महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ५३, ५४, ५५ किंवा ५६ (लागू असतील त्याप्रमाणे) अन्वये किंवा महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम १८९ अन्वये तात्काळ कार्यवाही करावयाची आहे व तसेच वरीलप्रमाणे नियुक्त पदनिर्देशित अधिकारी यांचा साप्ताहिक अहवाल संकलित करून घेऊन पडताळणी अधिकारी यांनी मासिक अहवाल सहायक कार्यालय निरीक्षकांमार्फत मा. मुख्याधिकारी यांचेकडे सादर करावयाचा आहे.

(७) वरील नमूद बीट निरीक्षक/बीट मुकादम, प्रभाग अधिकारी, पडताळणी अधिकारी यांच्यामध्ये बदल झाल्यास किंवा रजा कालावधीसाठी गेलेले असल्यास नवीन नियुक्त कर्मचारी/अधिकारी किंवा ज्याच्याकडे चार्ज देण्यात आला असेल यांना हा आदेश जसाचा तसा लागू राहील.

**डॉ. सचिन बागर,**
मुख्याधिकारी,
संगमनेर नगरपरिषद, संगमनेर,
जिल्हा अहमदनगर.

संगमनेर, ४ मार्च २०२१.

---

## खालील अधिसूचना असाधारण राजपत्र म्हणून खाली दर्शविलेल्या दिनांकांस प्रसिद्ध झालेल्या आहेत.

**शुक्रवार, मार्च १२, २०२१ / फाल्गुन २१, शके १९४२**

### जिल्हाधिकारी यांजकडून

**वाचले :** महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम ५१-अ, पोट-कलम *(४)* व महाराष्ट्र नगरपरिषद (उपाध्यक्ष निवडणूक) नियम, २००५ व सुधारणा २००६.

**आदेश**

क्रमांक पालिका-३/कावि-८६/२०२१.— महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम ५१-अ, पोट-कलम *(४)* व महाराष्ट्र नगरपरिषद (उपाध्यक्ष निवडणूक) नियम, २००५ व सुधारणा २००६ अन्वये, जिल्हाधिकारी यांना प्रदान केलेल्या

अधिकारान्वये महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम ५१-अ, पोट-कलम *(४)* च्या तरतुदींनुसार यावल नगरपरिषदेत निवडून आलेल्या उपाध्यक्षांचे नाव महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिद्ध करण्यात येत आहे.

मी, अभिजीत राऊत, जिल्हाधिकारी, जळगाव मला प्राप्त झालेल्या अधिकारान्वये या प्रकटनाद्वारे खालील नमूद उमेदवार नगरपरिषद, यावलच्या उपाध्यक्ष पदासाठी निवडून आल्याचे जाहीर करीत आहे.

**अनुसूची**

| निवडून आलेल्या उपाध्यक्षांचे नाव | | नगरपरिषदेचे नाव |
|---|---|---|
| १ | | २ |
| पौर्णिमा राजेंद्र फालक | .. | यावल |

**अभिजीत राऊत,**

जिल्हाधिकारी, जळगाव.

जळगाव, ३ मार्च २०२१.

---

## प्रभारी जिल्हाधिकारी यांजकडून

वाचावे.- (१) मा. राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्रमांक रानिआ/जिपपंस-२०१९/प्र.क्र.१९/का. ७, दिनांक १९ नोव्हेंबर २०१९.

(२) मा. राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्रमांक रानिआ/जिपपंस-२०१९/प्र.क्र.१९/का.७, दिनांक २० डिसेंबर २०१९.

(३) या कार्यालयाचे पत्र जिपपंस/निवडणूक/कावि/३६८/२०१९, दिनांक २१ डिसेंबर २०१९.

(४) मा. राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्रमांक रानिआ/जिपपंस-२०२१/प्र.क्र.५/का.७, दिनांक ५ मार्च २०२१.

(५) या कार्यालयाकडून प्रसिद्ध करण्यात आलेली दिनांक १० जानेवारी २०२० रोजीची अधिसूचना.

**आदेश**

क्रमांक क/कक्ष-५/ग्रापं./जि.प.पं.स./कावि./४२२/२०२१.--- उपोद्घातातील अनुक्रमांक-१ च्या पत्रान्वये धुळे जिल्हा परिषद व त्या अंतर्गत येणाऱ्या ०४ पंचायत समितीच्या सार्वत्रिक निवडणूक-२०२० साठी प्रभागरचना आरक्षण व सोडत कार्यक्रम देण्यात आला होता. त्याप्रमाणे धुळे जिल्हापरिषद व त्या अंतर्गत येणाऱ्या ०४ पंचायत समितीच्या अंतिम प्रभाग रचना व आरक्षण दिनांक १७ डिसेंबर २०१९ रोजी प्रसिद्ध करण्यात आला होता.

उपोद्घातातील अनुक्रमांक-१ च्या पत्रान्वये धुळे जिल्हा परिषद व त्या अंतर्गत येणाऱ्या ४ पंचायत समित्यांची सार्वत्रिक निवडणुकीचे मतदान दिनांक ७ जानेवारी २०२० रोजी होऊन दिनांक ८ जानेवारी २०२० रोजी मतमोजणी झाली असून महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण, भाग एक-अ, असाधारण क्रमांक ४ अन्वये या कार्यालयाचे आदेश क्रमांक/क/कक्ष-५/ग्रापंनि/कावि/६७/२०२०, दिनांक १० जानेवारी २०२० अन्वये धुळे जिल्हा परिषद व त्या अंतर्गत येणाऱ्या ४ पंचायत समितीमध्ये निवडून आलेल्या उमेदवारांची नावे प्रसिद्ध करण्यात आली होती.

उपोद्घातातील अनुक्रमांक-४ अन्वये जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक-२०२० च्या निवडणुकीबाबत मा. सर्वोच्च न्यायालयाच्या रिट याचिका (सिव्हिल क्रमांक-९८०/२०१९ व इतरमधील दिनांक ४ मार्च २०२१ रोजीच्या आदेशाच्या अनुषंगाने नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गातील निवडून आलेल्या उमेदवारांची निवडणूक रद्द करणेबाबत दिलेल्या निर्देशाप्रमाणे नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाकरिता जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ च्या कलम १२ (२) (क) नुसार देय असलेले २७ टक्के चे आरक्षण हे मा. सर्वोच्च न्यायालयाच्या के. कृष्णमूर्ती व इतर वि. भारत सरकार मधील आदेशानुसार कमाल ५० टक्के आरक्षणाच्या मर्यादेत ठेवून सदर जागांच्या फेरनिवडणुका घेण्याचे मा. राज्य निवडणूक आयोगाला निर्देश दिले आहेत.

सदर निवडणूक प्रक्रियेदरम्यान धुळे जिल्हा परिषद व त्या अंतर्गत येणाऱ्या ४ पंचायत समितीच्या नागरिकांच्या मागासवर्गप्रवर्गाची निवडणूक मा. सर्वोच्च न्यायालयाचे विशेष अनुमती याचिका क्रमांक ३३९०४-३३९१० मधील आदेशाच्या अधीन राहून घेण्यात येत असल्याबाबत उपोद्घातातील अनुक्रमांक-३ अन्वये कळविले होते. सदर बाब ही या कार्यालयाचे उपोद्घातातील अनुक्रमांक-३ अन्वये सर्व निवडणूक निर्णय अधिकारी या कार्यालयाचे पत्र क्रमांक क/कक्ष-५/जिपपंस/निवडणूक/कावि-३६८/२०१९, दिनांक २१ डिसेंबर २०१९ अन्वये सर्व निवडणूक निर्णय अधिकारी यांना कळविण्यात आले होते. तसेच त्याबाबतची व्यापक प्रसिद्धी ही दिनांक २१ डिसेंबर २०१९ रोजी प्रेस नोट देऊन स्थानिक वृत्तपत्रात त्याची प्रसिद्धी देण्यात आली आहे.

आजमितीस, उपोद्घातातील अनुक्रमांक-४ अन्वये जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक-२०२० च्या निवडणुकीबाबत मा. सर्वोच्च न्यायालयाच्या रिट याचिका (सिव्हिल) क्रमांक-९८०/२०१९ व इतर मधील दिनांक ४ मार्च २०२१ रोजीच्या आदेशान्वये अंतिम निर्णय-झाल्याने नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गातील निवडून आलेल्या उमेदवारांची निवडणूक रद्द करणेबाबत मा. राज्य निवडणूक आयोगाने निर्देश दिले आहेत. त्याअनुषंगाने, धुळे

जिल्हा परिषद व त्याअंतर्गत येणाऱ्या ४ पंचायत समितीच्या निवडणुकांमध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग यांच्याकरिता आरक्षण देण्यात आलेल्या एकूण जागांची संख्या त्या स्थानिक स्वराज्य संस्थेतील एकूण जागांच्या ५० टक्क्यांपेक्षा जास्त होत असल्यास, अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीस आरक्षित जागा एकूण ५० टक्के जागांमधून व वजा केल्यानंतर उर्वरित जागांमधून नागरिकांच्या मागसवर्ग प्रवर्गाकरिता जास्तीत जास्त २७ टक्के च्या मर्यादेत आरक्षण देय होत आहे. त्याप्रमाणे धुळे जिल्हा परिषद व त्याअंतर्गत येणाऱ्या ४ पंचायत समितीमध्ये ५० टक्के मर्यादेबाहेर आरक्षित झालेल्या जागांची आणि सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार देय असलेल्या नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाच्या जागांचा तपशील मा. आयोगाच्या दिनांक ५ मार्च २०२१ च्या पत्रासोबतच्या परिशिष्ट "अ" मध्ये दिला आहे.

मा. सर्वोच्च न्यायालयाच्या रिट याचिका (सिव्हिल) क्रमांक-९८०/२०१९ व इतर याचिकांमध्ये दिनांक ४ मार्च २०२१ रोजी दिलेल्या निर्णयातील परिच्छेद २८ मध्ये पुढीलप्रमाणे निर्देश दिले आहेत:

"Accordingly, these writ petitions must partly succeed. The Challenge to the validity of Section 12 (2) (c) of the 1961 Act is negatived. Instead, that provision is being read down to mean that reservation in favour of OBCs in the concerned local bodies can be notified to the extent that it does not exceed aggregate 50 per cent of the total seats reserved in favour of SCs/STs/OBCs taken together. In other words, the expression "Shall be" preceding 27 per cent occurring in Section 12 (2) (c), be construed as "may be" including to mean that reservation for OBCs may be upto 27 per cent but subject to the outer limit of 50 per cent aggregate in favour of SCs/STs/OBCs taken together, as enunciated by the constitution Bench of this Court. However, the impugned notifications/orders, dated 27/07/2018 and 14/02/2020 and all other similar notifications issued by the State Election Commission during the pendency of these Writ Petitions mentioning that the elections to the concerned local bodies were being held subject to the out come of these writ petitions, are quashed and set aside to the extent of providing reservations of seats in the concerned local bodies for OBCs".

त्याअनुषंगाने, मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निकालातील वर नमूद परिच्छेद २८ मधील आदेशानुसार ज्या ६ जिल्हा परिषदा व ४४ पंचायत समितीच्या निवडणुका न्यायालयाच्या निकालाच्या अधीन राहून जानेवारी २०२० मध्ये घेण्यात आल्या होत्या, त्यामध्ये तेथे ५० टक्केपेक्षा जास्त आरक्षण झाले आहे, तेथील नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाच्या सर्व जागा मा. सर्वोच्च न्यायालयाच्या दिनांक ४ मार्च २०२१ रोजीच्या निकालान्वये रिक्त झाल्याचे मानण्यात येईल, असे निर्देश दिले असल्याने, मा. राज्य निवडणूक आयोगाच्या दिनांक ५ मार्च २०२१ रोजीच्या पत्रासोबतच्या परिशिष्ट "अ" नुसार धुळे जिल्हा परिषद व त्या अंतर्गत येणाऱ्या ४ पंचायत समितीमधील नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्ग सदस्यांच्या सर्व जागा मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानुसार दिनांक ४ मार्च २०२१ पासून रिक्त झाल्या असल्याचे आदेश संबंधितांना बजावण्यात यावेत, असे निर्देश असल्याने खाली नमूद केलेल्या परिशिष्ट-१ व परिशिष्ट-२ मधील धुळे जिल्हा परिषद व त्याअंतर्गत येणाऱ्या ४ पंचायत समितीमधील नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गातील निवडून आलेल्या उमेदवाराचे सदस्यत्व मा. सचिव, राज्य निवडणूक आयोग यांचेकडील पत्र क्रमांक/रानिआ/जिपपंस-२०२१/प्र.क्र.५/का-७, दिनांक ५ मार्च २०२१ रोजीच्या पत्रान्वये दिलेल्या निर्देशानुसार तसेच मा. सर्वोच्च न्यायालयाच्या रिट याचिका (सिव्हिल) क्रमांक-९८०/२०१९ व इतर यांचिकांमध्ये दि. ४ मार्च २०२१ रोजी दिलेल्या निर्णयाप्रमाणे धुळे जिल्हा परिषद व त्याअंतर्गत येणाऱ्या ४ पंचायत समितीला देण्यात आलेल्या अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व नागरिकांचा मागासप्रवर्ग यांना देण्यात आलेल्या आरक्षणाबाबतचा तयार करण्यात आलेला परिशिष्ट-३ चा तक्त्याचे अवलोकन केले असता धुळे परिषदेसाठी (अनुसूचित जाती+अनुसूचित जमाती+नागरिकाचा मागासवर्ग प्रवर्ग) ला देण्यात आलेले आरक्षण हे ७३.२१ टक्के होत आहे. त्यानुसार ना. मा. प्रवर्गाच्या १५ पैकी १३ जागा सर्वसाधारण होत आहेत. तर धुळे जिल्हा परिषदे अंतर्गत येणाऱ्या ४ पंचायत समितीला अनुक्रमे (१) शिरपूर - ८९.२९ टक्के, (२) शिंदखेडा-५५.०० टक्के, (३) साक्री ८५.२९ टक्के, (४) धुळे ५६.६७ टक्के, होत आहे. म्हणजेच धुळे जिल्हा परिषद व त्याअंतर्गत येणाऱ्या ४ पंचायत समितीच्या निवडणुकांमध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग यांच्याकरिता देण्यात आलेले आरक्षण ५० टक्केपेक्षा जास्त होत असल्याने, अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीस आरक्षित जागा एकूण ५० टक्के जागांमधून वजा केल्यानंतर उर्वरित जागांमधून नागरिकांच्या मागास प्रवर्गाकरिता जास्तीत जास्त २७ टक्केच्या मर्यादेत आरक्षण देय आहे. त्याप्रमाणे यापूर्वी नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गासाठी देण्यात आलेल्या आरक्षणापैकी धुळे जिल्हा परिषदेचे १३ जागांचे नागरिकांचे मागासवर्ग प्रवर्गाचे आरक्षण हे अतिरिक्त होत आहे. धुळे जिल्हा परिषदेअंतर्गत येणाऱ्या ४ पंचायत समितीपैकी फक्त शिंदखेडा पंचायत समिती व धुळे पंचायत समितीस अनुक्रमे ४ व ६ नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गासाठी आरक्षित होत आहेत. तर शिरपूर ०८ पैकी ०८ जागा, शिंदखेडा ०५ पैकी ०१ जागा, साक्री-०९ पैकी ०९ जागा,धुळे ८ पैकी ०२ अशा एकूण २० जागा सर्वसाधारण होत आहेत.

त्याअर्थी, मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे व मा. आयोगाचे दिनांक ५ मार्च २०२१ रोजीच्या पत्रात दिलेल्या निर्देशाप्रमाणे धुळे जिल्हा परिषद व त्याअंतर्गत येणाऱ्या ०४ पंचायत समितीसाठी मा. राज्य निवडणूक आयोगाचे दिनांक १७ डिसेंबर २०१९ च्या निवडणूक कार्यक्रमाप्रमाणे निवडणुका होऊन उपोद्घातातील अनुक्रमांक-५ मधील अधिसूचनेत नमूद नागरिकांचा मागासप्रवर्गामधून निवडून आलेले खालील नमूद परिशिष्ट-१ मधील १५ जिल्हा परिषदेच्या सदस्यांचे परिशिष्ट-२ मधील ३० पंचायत समिती सदस्यांचे सदस्यत्व तसेच सदस्यत्व या नात्याने धारण करत असलेले जिल्हा परिषद व पंचायत समिती व त्या अनुषंगाने, इतर प्राधिकरणावरील सदस्यांचे सदस्यत्व मी, दिलीप ज्ञा. जगदाळे, जिल्हाधिकारी, धुळे या आदेशाद्वारे दि. ०४ मार्च २०२१ पासून पूर्वलक्षी प्रभावाने रद्द करीत आहे.

**धुळे जिल्हा परिषद निवडणूक २०१९-२० मध्ये नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गामधून निवडून आलेल्या परंतु मा. सर्वोच्च न्यायालयाच्या रिट याचिका (सिव्हिल) क्रमांक-९८०/२०१९ व इतर मधील दिनांक ०४ मार्च २०२१ रोजीच्या आदेशान्वये सदस्य पद रद्द करण्यात आलेल्या सदस्यांची नावे**

**परिशिष्ट-१**

| अ. क्र. | तालुक्याचे नाव | निवडणूक विभागाचा क्रमांक व नाव | निवडून आलेला प्रवर्ग | निवडून आलेल्या सदस्यांची नावे | उमेदवाराचा पत्ता |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | शिंदखेडा | १८-येटावद | ना. मा. प्रवर्ग स्त्री | वारुडे सपना नथ्थू | मु. म्हळसर, पो. मुडावद, तालुका शिंदखेडा, जिल्हा धुळे. |
| २ | शिंदखेडा | १९-नरडाणा | ना. मा. प्रवर्ग स्त्री | सिसोदे संजीवणी संजय | नरडाणा, तालुका शिंदखेडा, जिल्हा धुळे. |
| ३ | शिंदखेडा | २१-मालपूर | ना. मा. प्रवर्ग स्त्री | पाटील चंद्रकला हेमराज | मालपूर, तालुका शिंदखेडा, जिल्हा धुळे. |
| ४ | शिंदखेडा | २४-खलाणे | ना. मा. प्रवर्ग | कदम युवराज शिवाजी | कलमाडी, तालुका शिंदखेडा, जिल्हा धुळे. |
| ५ | धुळे | ४२-लामकानी | ना. मा. प्रवर्ग स्त्री | देवरे धरती निखिल | मु. पो. बोरीस, तालुका व जिल्हा धुळे |
| ६ | धुळे | ४४-कापडणे | ना. मा. प्रवर्ग | खलाणे रामकृष्ण देवराम | मु. पो. कापडणे, तालुका व जिल्हा धुळे |
| ७ | धुळे | ४५-फागणे | ना. मा. प्रवर्ग | जाधव अरविंद विक्रम | १०, शिवालय, अनमोलनगर, देवपूर, धुळे, तालुका व जिल्हा धुळे. |
| ८ | धुळे | ४६-नगाव बु. | ना. मा. प्रवर्ग | पाटील राघवेंद्र मनोहर | मु. पो. नगाव, तालुका व जिल्हा धुळे |
| ९ | धुळे | ४८-कुसुंबा | ना. मा. प्रवर्ग | पाटील संग्राम गोविंदा | मु. पो. कुसुंबा, तालुका व जिल्हा धुळे |
| १० | धुळे | ४९-नेर | ना. मा. प्रवर्ग स्त्री | खलाणे मनीषा शंकर | मु. पो. म्हसदी रोड, नेर, तालुका व जिल्हा धुळे. |
| ११ | धुळे | ५२-बोरविहिर | ना. मा. प्रर्वग स्त्री | पाटील मंदाबाई विश्वास | मु. पो. गरताड, तालुका व जिल्हा धुळे |
| १२ | धुळे | ५३-मुकटी | ना. मा. प्रवर्ग स्त्री | पाटील मंगलाबाई दिलीप | मु. पो. मुकटी, तालुका व जिल्हा धुळे |
| १३ | धुळे | ५४-शिरूड | ना. मा. प्रवर्ग | पाटील आशुतोष विजय | मु. पो. शिरूड, तालुका व जिल्हा धुळे |
| १४ | धुळे | ५५-रतनपुरा | ना. मा. प्रवर्ग | माळी देविदास दत्तात्रय | मु. पो. बोरकुंड, तालुका व जिल्हा धुळे |
| १५ | धुळे | ५६-बोरकुंड | ना. मा. प्रवर्ग स्त्री | पाटील शालिनी बाळासाहेब | मु. पो. बोरकुंड, तालुका व जिल्हा धुळे |

**धुळे जिल्हा परिषद अंतर्गत येणाऱ्या ४ पंचायत समितीच्या सन २०१९-२० मधील निवडणुकीमध्ये नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गामधून निवडून आलेल्या परंतु मा. सर्वोच्च न्यायालयाच्या रिट याचिका (सिव्हिल) क्रमांक-९८०/२०१९ व इतर मधील दिनांक ०४ मार्च २०२१ रोजीच्या आदेशान्वये सदस्य पद रद्द करण्यात आलेल्या सदस्यांची नावे**

**परिशिष्ट-२**

| अ. क्र. | तालुक्याचे नाव | पंचायत समिती निर्वाचन गणाचे नाव | निवडून आलेला प्रवर्ग | निवडून आलेल्या उमेदवारांची नावे | उमेदवारांचा पत्ता |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | शिरपूर | १५-अर्थे खु. | ना. मा. प्रवर्ग | पाटील शशिकांत माधवराव | अर्थे खु., तालुका शिरपूर, जिल्हा धुळे |
| २ | शिरपूर | १६-विखरण बु. | ना. मा. प्रवर्ग स्त्री | पाटील विनिताबाई मोहन | नवे भामपूर, तालुका शिरपूर, जिल्हा धुळे. |
| ३ | शिरपूर | १८-तऱ्हाडी त. त. | ना. मा. प्रवर्ग स्त्री | भामरे प्रतिभा कैलास | तऱ्हाडी त. त., तालुका शिरपूर, जिल्हा धुळे. |

**परिशिष्ट-२--***चालू*

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
|---|---|---|---|---|---|
| ४ | शिरपूर | १९-वनावल | ना. मा. प्रवर्ग स्त्री | चौधरी ममता ईश्वर | भरवाडे, तालुका शिरपूर, जिल्ह धुळे |
| ५ | शिरपूर | २०-जातोडा | ना. मा. प्रवर्ग | पाटील निलेश विश्वासराव | बाळदे, तालुका शिरपूर, जिल्हा धुळे |
| ६ | शिरपूर | २१-शिंगावे | ना. मा. प्रवर्ग | महाजन रामकृष्ण विठोबा | उंटावद, तालुका शिरपूर, जिल्हा धुळे |
| ७ | शिरपूर | २२-करवंद | ना. मा. प्रवर्ग स्त्री | सोनवणे वैशाली सुनिल | मांडळ, तालुका शिरपूर, जिल्हा धुळे |
| ८ | शिरपूर | २५-अजनाड | ना. मा. प्रवर्ग | जाधव दर्यावसिंग भिमसिंग | बभळाज, तालुका शिरपूर, जिल्हा धुळे |
| ९ | शिंदखेडा | २९-दाऊळ | ना. मा. प्रवर्ग स्त्री | पाटील मालूबाई भाईदास | मंदाणे, तालुका शिंदखेडा, जिल्हा धुळे |
| १० | शिंदखेडा | ३४-वर्षी | ना. मा. प्रवर्ग | राकेश ऊर्फ भरत मधुकर पवार | कमखेडा, तालुका शिंदखेडा, जिल्हा धुळे |
| ११ | शिंदखेडा | ३९-हतनूर | ना. मा. प्रवर्ग स्त्री | बोरसे प्रमिलाबाई पंडित | साळवे, तालुका शिंदखेडा, जिल्हा धुळे |
| १२ | शिंदखेडा | ४३-खर्दे बु. | ना. मा. प्रवर्ग | देवरे दगाजी शिवराम | कर्ले, तालुका शिंदखेडा, जिल्हा धुळे |
| १३ | शिंदखेडा | ४४-मेथी | ना. मा. प्रवर्ग स्त्री | गोसावी मंगलाबाई साहेबराव | मेथी, तालुका शिंदखेडा, जिल्हा धुळे |
| १४ | साक्री | ५१-दुसाणे | ना. मा. प्रवर्ग स्त्री | भदाणे कलाबाई शामराव | दुसाणे, तालुका साक्री, जिल्हा धुळे |
| १५ | साक्री | ५३-बळसाणे | ना. मा. प्रवर्ग स्त्री | खंडेकर इंदूबाई निंबा | बळसाणे, तालुका साक्री, जिल्हा धुळे |
| १६ | साक्री | ५४-घाणेगाव | ना. मा. प्रवर्ग | महाले रोहीदास दगा | आमोडे, तालुका साक्री, जिल्हा धुळे |
| १७ | साक्री | ५५-जैताणे | ना. मा. प्रवर्ग | मुजगे अशोक गंगा | आदर्श विद्यामंदिरामागे, धनगरवाडा, जैताणे, तालुका साक्री, जिल्हा धुळे. |
| १८ | साक्री | ७१-पिंपळनेर | ना. मा. प्रवर्ग स्त्री | पगारे सविता राजेंद्र | गोपाळनगर, पिंपळनेर, तालुका साक्री, जिल्हा धुळे. |
| १९ | साक्री | ७२-चिकसे | ना. मा. प्रवर्ग | सुर्यवंशी अजय भगवान | चिकसे, तालुका साक्री, जिल्हा धुळे |
| २० | साक्री | ७६-धाडणे | ना. मा. प्रवर्ग स्त्री | अकलाडे रोहिणी सुधीर | देगाव, तालुका साक्री, जिल्हा धुळे |
| २१ | साक्री | ७७-कासारे | ना. मा. प्रवर्ग स्त्री | देसले मनीषा अनिल | कासारे, तालुका साक्री, जिल्हा धुळे |
| २२ | साक्री | ८१-म्हसदी प्र. नेर. | ना. मा. प्रवर्ग | देसले राजधर उत्तम | काळगाव पो. धमनार, तालुका साक्री, जिल्हा धुळे. |
| २३ | धुळे | ८३-लामकानी | ना. मा. प्रवर्ग स्त्री | पाटील चंद्रकला भानुदास | मु. पो. लामकानी, तालुका व जिल्हा धुळे. |
| २४ | धुळे | ८८-न्याहळोद | ना. मा. प्रवर्ग | पाटील विकास सुधाकर | मु. पो. न्याहळोद, तालुका व जिल्हा धुळे. |
| २५ | धुळे | ९०-फागणे | ना. मा. प्रवर्ग | सूर्यवंशी आत्माराम रमेश | मु. पो. फागणे, तालुका व जिल्हा धुळे. |
| २६ | धुळे | ९७-नेर | ना. मा. प्रवर्ग स्त्री | जयस्वाल सोनु सुमित | मु. पो. नेर, तालुका व जिल्हा धुळे. |
| २७ | धुळे | १०१-सडगाव | ना. मा. प्रवर्ग स्त्री | सुनिता सोपान पाटील | मु. पो. सडगाव, तालुका व जिल्हा धुळे. |
| २८ | धुळे | १०४-बोरविहिर | ना. मा. प्रवर्ग | पाटील लक्ष्मण पितांबर | मु. पो. बाभूळवाडी, तालुका व जिल्हा धुळे. |
| २९ | धुळे | १०५-मुकटी | ना. मा. प्रवर्ग | पाटील पंढरीनाथ बुधा | मु. पो. मुकटी, तालुका व जिल्हा धुळे. |
| ३० | धुळे | १०७-शिरूड | ना. मा. प्रवर्ग स्त्री | शिंदे लक्ष्मीबाई फकीरा | मु. पो. शिरूड, तालुका व जिल्हा धुळे. |

**दिलीप ज्ञा. जगदाळे,**

प्रभारी जिल्हाधिकारी, धुळे.

धुळे, ९ मार्च २०२१.

**मंगळवार, मार्च १६, २०२१ / फाल्गुन २५, शके १९४२**

## जिल्हाधिकारी यांजकडून

**वाचले :** (१) महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती (नामनिर्देशित सदस्यांची अर्हता व नियुक्त्या करण्याची पद्धत) नियम, २०१० चे नियम ६ अन्वये.

### आदेश

क्रमांक पालिका-३/कावि-८७/२०२१.– महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती (नामनिर्देशित सदस्यांची अर्हता व नियुक्त्या करण्याची पद्धत) नियम, २०१० चे नियम ६ अन्वये, नामनिर्देशित सदस्यांची नावे राजपत्रात प्रसिद्ध करण्यासाठी जिल्हाधिकारी यांचेमार्फत सादर करण्याबाबतच्या सूचना नगर विकास विभाग यांचेकडील शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण-२०१६/प्र. क्र. ४६६/नवि-२०, दिनांक २१ डिसेंबर २०१६ अन्वये सूचित केलेले असल्याने सदर नामनिर्देशित सदस्य यांचे नाव महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिद्ध करण्यात येत आहे.

यास्तव, मी, अभिजीत राऊत, जिल्हाधिकारी, जळगाव मला प्राप्त झालेल्या अधिकारांन्वये या प्रगटनाद्वारे नगरपरिषद, अमळनेरचे खालील अनुसूचीत नमूद सदस्य यांची नामनिर्देशित सदस्य म्हणून निवड करण्यात आल्याचे जाहीर करीत आहे.

### अनुसूची

| निवडून आलेल्या नामनिर्देशित सदस्यांचे नाव व पदाचे नाव | | पद | नगरपालिकेचे नाव |
|---|---|---|---|
| १ | | २ | ३ |
| श्रीराम भगवान चौधरी | .. | नामनिर्देशित (स्विकृत) सदस्य | अमळनेर |

**अभिजीत राऊत,**
जिल्हाधिकारी, जळगाव.

जळगाव, ८ मार्च २०२१.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT YERAWADA PRISON PRESS, PRISON COMPOUND, YERAWADA, PUNE-411 006 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI – 400 004.

EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.